**<u>पालघर जिल्हा पोलीस शिपाई ( बॅन्डस्मन ) भरती २०२२-२३ लेखी परीक्षेकरीता येणाऱ्या उमेदवारांना राहण्याची व्यवस्था केलेबाबत.</u>**

महाराष्ट्र पोलीस शिपाई भरती – २०२२-२३ च्या अनुषंगाने पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई ( बँड्स्मन ) या रिक्त पदांच्या जागेसाठी लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा दि. २५/०७/२०२४ वार गुरवार रोजी सकाळी १०:०० वाजता **जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, दुसरा माळा, रुम नं २१५, पालघर बोईसर रोड, कोळगाव, ता. जि. पालघर पिन.नं. ४०१४०४** येथे होणार आहे. नमूद ठिकाणी उमेदवारांना सकाळी ठिक ०८:०० वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावयाचे आहे.

सदर लेखी परीक्षेकरीता महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून उमेदवार येणार आहेत. त्यांची पालघर येथे आल्यानंतर राहण्याची गैरसोय होवू नये याकरीता खालील नमूद ठिकाणी त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

- **<u>पुरुष / महिला उमेदवार यांचेसाठी राहण्याची व्यवस्था :- श्री अंबामाता मंदिर हॉल, पाचबत्ती, पालघर</u>**

सदर बाबत काही अडचण असल्यास श्री. अनंत पऱ्हाड, प्रभारी अधिकारी पालघर पोलीस ठाणे यांना ९३७२२८७२५४ किंवा श्री. सुयोग कांबळे, पालघर पोलीस ठाणे यांना ९५५२३२४५९५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

( संगिता शिंदे अल्फोन्सो )
पोलीस उपअधीक्षक ( गृह ) पालघर

पोलीस अधीक्षक पालघर
SUPDT. OF POLICE PALGHAR

AnyScanner